8MHPU180004862021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :– | ०६/०३/२०२१ |
| नोंदणी तारीख | :– | १२/०३/२०२१ |
| निकाल तारीख | :– | २७/०८/२०२६ |
| कालावधी | :– | **वर्षे महिने दिवस** |
| | | **०५ ०५ २१** |

**(भाग – “अ")**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.३, दौंड यांचे न्यायालयात, ता. दौंड, जिल्हा – पुणे**

(पिठासीन अधिकारी : श्रीमती एस.एन.निकम)

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२३९/२०२१ **निशाणी क्र.८ खाली**

**(निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,**
**विभागीय भरारी पथक, पुणे विभाग, गु.र.नं.४५९/२०२०)**

फिर्यादी :- महाराष्ट्र सरकार तर्फे,
राज्य उत्पादन शुल्क,
विभागीय भरारी पथक, पुणे

सरकारतर्फे सादरकर्ते :– सहा. सरकारी अभियोक्ता
श्रीमती के. बी. भोसले

... . **विरुध्द** ... .

आरोपी :– **शंकर उलगप्पा भंडारी,**
वय – २५ वर्षे,
व्यवसाय – विनापरवाना ताडीची विक्री करणे,
रा. नाथाचीवाडी, मोरडेवाडी, ता. दौंड, जि. पुणे

आरोपी तर्फे सादरकर्ते :– विधीज्ञ श्री. पी. डी. खंडागळे

**(भाग – "ब“)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २१/११/२०२० |
| प्रथम खबर अहवाल नोंदणीची तारीख | २१/११/२०२० |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०५/०३/२०२१ |
| पुरावा आरंभ केल्याची तारीख | ०४/११/२०२३ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखुन ठेवला ती तारीख | २७/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७/०८/२०२६ |
| शिक्षा झाली असेल तर ती तारीख | ---- |

**आरोपीचा तपशिल**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेली कलम | निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | शिक्षेत सुट दिलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शंकर उलगप्पा भंडारी | २१.११. २०२० | २१.११. २०२० | मुं.दा.का. कलम ६५ (ई) | निर्दोष | - | - |

**(भाग - "क")**

**अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदारांची नावे | साक्षीदारांचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रताप तुकाराम कदम | फिर्यादी | १८ |

आरोपीतर्फे कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीतर्फे पुरावा नाही.

**अभियोग पक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी नंबर दिलेल्या कागपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १८ | फिर्याद जबाब |
| २. | १९ | छापील प्रथम खबर अहवाल |

**"ड" - गुन्हयातील जप्त वस्तु / मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | एम.आर.नं.४५९/२०२० | १ लि.क्षमतेचे ७५ प्लॅस्टीकचे फुगे ताडीने भरलेले |
| | | ३५ लि.क्षमतेचे २ कॅन ताडीने भरलेले |
| | | २० प्लॅस्टीक मग |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## ( <u>दिनांक २७/०८/२०२६ रोजी पारीत</u> )

**०१.** आरोपी मुंबई दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दोषारोप संबंधीच्या संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**<u>अभियोगपक्षाच्या खटल्याची संक्षिप्त हकीकत पुढील प्रमाणे</u> :**

**०२.** अभियोगपक्षाचे कथनाप्रमाणे दि.२१.११.२०२० रोजी खात्रीलायक बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील नाथाचीवाडी गावच्या हद्दीत मोरडेवस्ती येथे राहत्या घरात विनापरवाना ताडीची विक्री होत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन फिर्यादी यांनी त्यांच्या स्टाफसह बातमीच्या ठिकाणी जावून दारुबंदी गुन्हयाअंतर्गत छापा मारला असता तेथे आरोपीने त्याचे ताबे कब्ज्यात अंदाजे किंमत रुपये ३३००/– इतक्या किंमतीची ताडी व इतर मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेला मिळून आल्याने फिर्यादी यांनी आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली.

**०३.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती के.बी. भोसले व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.श्री. पी. डी. खंडागळे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन निशाणी क्रमांक २६ खाली नोंदविणेत आले.

**०५.** प्रस्तुत प्रकरणातील दोषारोप व अभिलेखावरील दाखल पुरावा व कागदपत्रे तसेच दोन्ही वकिलांचा युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे उपस्थितीत होतात. सदर मुद्दयावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दि.२१.११.२०२० रोजी खात्रीलायक बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पुणे जिल्हयातील दौंड तालुक्यातील नाथाचीवाडी गावच्या हद्दीत मोरडेवस्ती येथे राहत्या घरात विनापरवाना आरोपीने त्याचे ताबे कब्ज्यात अंदाजे किंमत रुपये ३३००/– इतक्या किंमतीची ताडी व इतर मुद्देमाल विक्री करण्याकामी | **...नकारार्थी** |

स्वतःजवळ बाळगला असल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ?

२. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे.**

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ साठी :–</u>**

**०६**. प्रामुख्याने या ठिकाणी नमूद करावे लागेल की, आरोपीवरील दोषारोप शाबीत करणेसाठी अभियोगपक्षास आरोपी बिगर परवाना, ताडी साठा रु. ३३००/– किंमतीचा मुद्देमाल विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतःजवळ बाळगून मिळून आला हा अंतर्भुत घटक सिध्द करावा लागेल.

**०७.** आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र.१ प्रताप प्रकाश तुकाराम कदम यांची साक्ष निशाणी क्र.१८ वर नोंदवण्यात आली. त्यांनी त्यांचे साक्षीमध्ये कथन केले की, दि.२१/११/२०२० रोजी गायकवाड साहेबांनी त्यांना नाथाच्या वाडी हददीत खुटबाव रोड लगत ताडी विक्रीचा धंदा आहे तिथे छापा घालायचा आहे असे सांगितले. त्याकरीता ते ९ वाजता सरकारी वाहनाने तिथे पोहोचले. वाहन अलीकडे लावून पायी चालत गेले. एक इसम लॅस्टीक फुगे घेवून प्लॅस्टीकचा ड्रम घेवून विक्री करत असताना मिळून आले. साहेबांनी स्वतः व पंचाची ओळख सांगून विचारले असता त्यांनी ताडी आहे व विक्री करत असल्याचे सांगितले. वास घेतला असता आंबूस वास आला. झडती घेतली असता २ प्लॅस्टीक कॅन ३५ लिटर व प्लॅस्टीकचे पाऊच असे ३३०० / रुपयांचा मुददेमाल मिळून आला. जप्त मुददेमालापैकी १८० मिली वेगळी रासायनिक पृथकरणासाठी काढून त्याला सिलबंद केले. आरोपीला अटक केली. त्यांनी फिर्याद दिली होती. नि.क्र.१९ व २० वरील फिर्याद व एफआयआरवर त्यांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे, असे कथन केले आहे.

**०८.** साक्षीदाराने त्यांच्या उलटतपासात असे कथन केले आहे की, त्यांना बातमी किती वाजता मिळाली त्याची त्यांनी स्टेशन डायरीला नोंद केली नाही. सरकारी वाहन बाहेर काढताना त्याची रजिस्टरला नोंद केली होती. त्याचा उतारा त्यांनी दाखल केला नाही. ते

घटनास्थळावर ८.५० वाजता पोहचले असतील. ते एकूण ६ जण होते. अधिकारी गायकवाड, जवान दोन, दोन पंच व ते स्वतः, रमेश शितोळे व जाधव हे पंच होते. दुस–या पंचाचे पुर्ण नाव त्यांना सांगता येत नाही. रामदास नारायण जाधव होते. रेड टाकायला जातांना रिकाम्या बॉटल सोबत नेतो. त्यादिवशी तीन किंवा चार ठिकाणी रेड टाकल्या होत्या. त्या रेड मधून टोटल माल किती गोळा केला हे त्यांना सांगता येणार नाही. तो माल एकाच गोडावून मध्ये ठेवला होता. तो माल त्याच दिवशी गोडाऊनला ठेवला होता. सीए रिपोर्टकरीता ते त्यांच्या दुचाकीने गेले होते. सरकारी वाहन उपलब्ध नसल्याने ते दुचाकीने गेले होते परंतु त्याची नोंद नाही. सीए रिपोर्ट घेवून जात आहे त्याबददल त्यांनी नोंद केली नव्हती.

०९. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोगपक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर सादर केलेला नाही. अभियोगपक्षातर्फे फिर्यादी वगळता इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही. तसेच फिर्यादीने सरकारी वाहन उपलब्ध नसल्याने ते स्वतःच्या दुचाकीने गेले होते त्याची नोंद त्यांनी केली नाही. त्यांना बातमी किती वाजता मिळाली त्याची त्यांनी स्टेशन डायरीला नोंद केली नाही. सदर साक्षीदाराच्या साक्षीमध्ये व नि.क्र.१९ वरील फिर्यादमध्ये तफावत दिसून येते. तसेच सदर साक्षीदाराने घटनेदिवशी तीन ते चार ठिकाणी छापा टाकला होता. त्यामुळे सर्व मुद्देमाल एकाच गोडावूनमध्ये ठेवण्यात आला होता हे मान्य केलेले आहे. अभियोगपक्षातर्फे जप्ती पंच यांना तपासलेले नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा आरोपीचे ताब्यातून जप्त करण्यात आला होता हे अभियोगपक्षाने निःसंशयपणे शाबीत केले नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे इतर महत्वाचे साक्षीदार तपासलेले नाहीत. अभिलेखावर आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होईल असा कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे आरोपी बिगर परवाना, ताडीची साठा व विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. त्यामुळे मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविणेत येते.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u> –**

१०. वर नमूद चर्चा, निरीक्षण आणि निष्कर्ष पाहता अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरले, त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## :: आदेश ::

१. **आरोपी** शंकर उलगप्पा भंडारी यांची मुंबई दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तिक जातमुचलका (बंधपत्र) व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम १५,०००/– रुपयाचे वैयक्तिक बंधपत्र लिहून द्यावे.

४. जप्त मुद्देमाल १ लि.क्षमतेचे ७५ प्लॅस्टीकचे फुगे ताडीने भरलेले, ३५ लि.क्षमतेचे २ कॅन ताडीने भरलेले असा सर्व मुद्देमाल अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, पुणे यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे.

५. जप्त मुद्देमाल २० प्लॅस्टीक मग मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर कायदयाप्रमाणे त्याची विल्हेवाट करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

NIKAM SNEHAL NIVASRAO
Digitally signed by NIKAM SNEHAL NIVASRAO
Date: 2026.08.27 16:58:09 +0530

दौंड
दिनांक : २७/०८/२०२६.

**(श्रीमती एस.एन.निकम)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.३, दौंड

**C E R T I F I C A T E**

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | A.I.Patel |
| Court name | : | Hon'ble S.N. Nikam<br>$3^{rd}$ Jt. C.J.J.D., Daund<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Date of order | : | 27.08.2026 |
| Order signed by<br>Presiding Officer on | : | 27.08.2026 |
| Order uploaded on | : | 27.08.2026 |